# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र. कबचौउमवि/बातमी/ई-मेल/२०२० दि. ३१ जुलै,२०२०

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी) कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाने टाळेबंदीचा कालावधी वाढविल्यामुळे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परीसर, संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था येत्या दि.३१ ऑगस्ट पर्यंत बंद राहणार आहेत. मात्र विद्यापीठ व महाविद्यालयात मर्यादित कर्मचारी दैनंदिन कामासाठी आळीपाळीने उपस्थित राहतील.

याकाळात सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालय न सोडता घरी बसूनच आवश्यक असेल ती कार्यालयीन कामे करावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांनी शुक्रवार दि.३१ जुलै रोजी परीपत्रक निर्गमित केले असून त्यामध्ये ३१ ऑगस्ट पर्यंत राज्य शासनाच्या निर्देशानुसार टाळेबंदीचा कालावधी वाढविला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. शिक्षकांनी या काळात घरी राहून काम करावे असे या परीपत्रकात नमूद केले आहे. शिक्षक व संशोधकांनी ऑनलाईन कंटेन्ट विकसित करणे, ऑनलाईन अध्यापन व मूल्यमापन, पुढील शैक्षणिक वर्षासाठी शैक्षणिक साहित्य तयार करणे, संशोधन लेखा संदर्भात कार्यवाही करणे, प्रश्नसंच तयार करणे, नाविन्यपूर्ण प्रकल्प तयार करणे तसेच शिक्षकांनी उत्तरपत्रिका तपासणे, निकाल तयार करणे व जाहिर करणे, ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे कामकाज करणे, आयक्युएसी संदर्भातील कामे करणे आदींसाठी हा काळ उपयोगात आणावा असे या परीपत्रकात नमूद करण्यात आले असून अत्यावश्यक सेवा यातून वगळण्यात आल्या आहेत.

बातमी क्र.२

जळगाव दि. ३१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने एमकेसीएल पुणे या संस्थेशी केलेल्या करारांतर्गत डिजीटल युनिव्हर्सिटी डिजीटल कॉलेज पोर्टल वर लॉगीन मध्ये नव्याने उपलब्ध करुन दिलेल्या विविध सुविधा तसेच ऑनलाईन प्रवेशा संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेसाठी दि. ४ ते ८ ऑगस्ट याकालावधीत कॉलेज सांकेतांकानुसार आयोजित करण्यात आली आहे.

सदरचे प्रशिक्षण हे दि. ४ ऑगस्ट पासून दररोज दुपारी २.३० आयोजित करण्यात आले आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम पुढीलप्रमाणे महाविद्यालय सांकेतांक क्र.१०००१ ते १२००७२ करीता प्रशिक्षण दि ४ ऑगस्ट रोजी, सांकेतांक क्र.१३००२० ते १९०१३०, दि.५ ऑगस्ट रोजी, सांकेतांक क्र.२००००१ ते २२०१२६ दि.६ ऑगस्ट रोजी, सांकेतांक क्र.२३००३२ ते २८००६१ दि.७ ऑगस्ट रोजी आणि विद्यापीठ प्रशाळा व दूरशिक्षण केंद्राकरीता दि.८ ऑगस्ट रोजी ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी युझर आयडी आणि पासवर्ड हा ईमेल व टेलिग्राम ग्रुपवर पाठविण्यात येणार आहे. तरी सर्व संबंधितांनी या प्रशिक्षात सहभागी व्हावे असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी केले आहे.

---------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

जळगाव

महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी